स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

नांदेड जिल्हयातील कला स्थापत्याचा चिकित्सक अभ्यास
संशोधन आराखडा

Submitted by
Researcher Fellow

Aarti Lalchand Bhagat
(M.A.Set, History)
Nanded (Maharashtra)

मार्गदर्शक
डॉ. शिंदे संगिता
पदव्युत्तर इतिहास विभाग
यशवंत महाविद्यालय, नांदेड

Submitted to

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
YEAR - 2019

नांदेड जिल्हयातील कला स्थापत्याचा चिकित्सक अभ्यास

प्रस्तावना :

नांदेडला प्राचीन इतिहास आणि सांस्कृतीचा वारसा लाभलेला असून तो नांदेडच्या जडणघडणीत नांदेड मधील भौगोलीस स्थिती, नांदेडचे प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक हा देखील वारसा लाभलेला आहे. दक्षिण भारताच्या इतिहास प्राचिन कालखंडात नांदेड जिल्हयातील किल्ले, मंदिरे, लेणी, स्तुप लेख, शिलालेख, नाणी, मूर्ती व ताम्रपट तसेच प्राचीन जल व्यवस्थापन या संदर्भातील माहिती.

ऐतिहासीकदृष्टया प्राचीनतम वस्तीस्थान आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीचे उगमस्थान म्हणजे नांदेड परिसर आहे. येथे नंद, सातवाहन, चाणाक्य, राष्ट्रकुल काळातील व यादव घराण्याच्या सत्ता होत्या. राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, ऐतिहासीक दृष्टया नांदेड जिल्हयाला महत्त्व आहे.

या प्रबंधामध्ये साधनाचा, संदर्भग्रंथाच्या आधारे पुरातत्वीय अवशेषाचा आधारे अभ्यास करण्याचा प्रयत्न प्रकरणाद्वारे करण्यात येत आहे.

1 संशोधनाची गरज / महत्त्व :

नांदेड जिल्हयातील प्राचीन इतिहास व संस्कृतीचा वारसा लाभला आहे. वास्तुकला शिल्पकला, हा वारसा ऐतिहासिक सामजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्टीने महत्वाचा आहे. परंतु हा वारसा आजतागायत म्हणावा तेवढा प्रकाशात आलेला नाही. याच्या प्रकाशात आलेल्याने प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत नांदेड जिल्हयाचा राजकीय, सामाजिक, भौगोलिक धार्मिक सांस्कृतीक व कलात्मक बाबीमध्ये भर पडणार आहे. म्हणून नांदेड जिल्हयातील कला स्थापत्याचा चिकित्स अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते हा विषय प्रकाशात आणून समाजात माहिती पोहचविण्याची आवश्यकता आहे. म्हणून या दुर्लक्षित विषयावर संशोधन होणे गरजेचे आहे.

या जिल्हयात विविध प्रकाराचा स्थापत्य, कलाशैली बांधलेले मंदिर, शिल्प, ताम्रपट किल्ले, लेण्या अशी पुरातणीय सामुग्री आहे. त्यात माहूर मंदिरे , कंधारची मंदिर, किल्ला, माहूरचा किल्ला, नंदगिरीचा किल्ला, होट्टल , अर्धापूर , शिरुर शिलालेख, पांडवलेण्या, देगलूर स्थापत्य शिल्पस्थापत्य , जलव्यवसाय इ. आढळून येते. काही शिल्प या नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. म्हणून या स्थापत्याचा अभ्यास महत्वाचा आहे. हजारो वर्षाचा हा वारसा जतन

करण्यासाठी व संवर्धनासाठी या जिल्हयाच्या सांस्कृतिक वैभवात भर टाकण्यासाठी ऐतिहासीक व कलाचा दृष्टीकोणातून नांदेड जिल्हयातील कला, स्थापत्याचा चिकित्सक अभ्यास याची संशोधनाला गरज आहे.

2 विषय निवडीचा हेतु / उद्दीष्टये :

1) नांदेड जिल्हयाचा ऐतिहासीक भौगोलिक, राजकीय धार्मिक व सांस्कृतिक दृष्टीने अभ्यास करणे.

2) नांदेड जिल्हयातील कला स्थापत्याचा शोध घेणे.

3) पुरातात्वीक दृष्टीकोनातून नांदेड जिल्हयाचे ऐतिहासीक महत्त्व जाणने.

4) चिकित्सक व तुलनात्मक दृष्टीने नांदेड जिल्हयातील पुरातत्व दृष्टीने स्थापत्याचा अभ्यास करणे.

5) किल्ले, मंदिर, लेण्या, शिलालेख, शिल्पस्थापत्य, शिल्पकला, इ च्या माध्यमातून राजकीय इतिहास अभ्यासणे.

6) नांदेड जिल्हयाचे धार्मिक महत्व स्पष्ट करणे.

7) नांदेड जिल्हयातील पुरातत्वाचा महाराष्ट्रातील इतर पुरातत्वीय स्थळासोबत तुलनात्मक, अभ्यास करणे, मानवी जिवनात पुरातत्वाचे स्थापत्यांचा महत्व स्पष्ट करणे.

3 संशोधनाची गृहितके :

1) नांदेड जिल्हयात प्राचीन किल्ला स्थापत्य अभ्यास करणे.

2) नांदेड जिल्हयाला पुरातत्वाचा प्राचीन ऐतिहासिक वारसा आहे.

3) नांदेड जिल्हयात विविध ठिकाणी विविध प्रकारच्या स्थापत्याचे अवशेष आढळतात.

4) नांदेड जिल्हयात विविध शिल्पकला आढळते.

5) नांदेड जिल्हयातील विविध स्थळाच्या सांस्कृतिक इतिहासात अनेक धर्माचे योगदान आहे.

6) नांदेड जिल्हयातील पुरातत्व विविध धर्माचा प्रभावातून निर्माण झाले आहे.

4 समस्या सुत्रण :-

कॉपर या तत्त्वज्ञाच्या म्हणण्याप्रमाणे **आपण कुठल्याही विद्याशाखेचे विद्यार्थी नसतो तर आपण एखादया समस्येचे विद्यार्थी असतो.** म्हणून नांदेड जिल्हयातील कला स्थापत्याचा चिकित्सक अभ्यास हा विषय निवडला आहे. या विषयाचा अभ्यास हा विषय निवडला आहे. या विषयाचा अभ्यास करताना आजपर्यंत संशोधनाद्वारे जे स्थापत्य सापडलेले आहे. त्याकडे दुर्लक्ष न करता व अज्ञान ऐतिहासीक स्थापत्य उपलब्ध साधनावरुन त्यांची योग्य मांडणी करणे. ही प्रस्तुत संशोधनातील समस्या आहे. म्हणून झालेल्या संशोधनाचा आढावा घेऊन नवीन माहिती उजेडात आणणे गरजेचे आहे.

5 संशोधन साहित्याचे परिशिलन :-

प्रस्तुत संशोधनासाठी **नांदेड जिल्हयातील कला, स्थापत्याचा चिकित्सक अभ्यास** माहिती नांदेड जिल्हा गॅझेट, डॉ. श्रीनिवास रिती आणि डॉ. शेळके जी.सी. यांनी आपल्या **इनास्क्रिशन्स फ्रॉम नांदेड डिस्ट्रीक्ट** या ग्रंथामध्ये नांदेड जिल्हयातील महत्वपूर्ण असे पन्नास शिलालेख प्रकाशित केले आहेत.

डॉ. प्रभाकर देव यांनी **द टेम्पल्स ऑफ मराठवाडा** या त्यांच्या प्रकाशित प्रबंधामध्ये मराठवाडयातील अनेक मंदिरांचा वास्तुशास्त्राच्या, कला स्थापत्याच्या , दृष्टीकोनातून महत्त्वपूर्ण असा अभ्यास केला. नांदेड जिल्हयातील होट्टल व राहेर येथील मंदिराची माहिती त्यातुन मिळते.

डॉ. अरुणचंद्र पाठक यांनी **गोदावरीचे खोरे** एक सांस्कृतिक अभ्यास या अप्रकाशित प्रबंधामध्ये गोदा परिसरातील महानुभवांच्या अनेक स्थळांची माहिती दिलेली आहे. नांदेड जिल्हयातील माहूर, राहेर , नांदेड येथील माहिती मिळते. त्याच बरोबर त्यांनी नांदेड जिल्हयातील अनेक मंदिरे आणि मूर्ती शिल्पांची माहिती प्रकाशित केली आहे.

डॉ. भगवान देशमुख यांच्या **इकनोग्राफी ऑफ हिंदू टेम्पल्स इन मराठवाडा** या प्रकाशित प्रबंधामध्ये मराठवाडयातील अनेक मूर्ती शिल्पांचा मूर्ती शास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास केलेला आहे.

डॉ. हरिहर ठोसर यांनी **स्टीज इन द हिस्ट्रॉरिकल ॲण्ड कल्चरल, जॉग्रफी ॲण्ड इथनोग्राफी ऑफ मराठवाडा** या अप्रकाशित प्रबंधामध्ये मराठयातील अनेक प्राचीन स्थाने

प्रकाशात आली आहेत. नांदेड जिल्हयातील अनेक, प्राचीन स्थाने प्रकाशात आणावयाची असल्याने साहित्यातून शोध ग्रंथामधून, उपलब्ध असलेल्या साधनावरुन त्या संदर्भात शोध प्रबंधनात यावर अभ्यास करावयाचे आहे.

प्रस्तुत संशोधनाची तात्पुरती रुपरेषा पुढील प्रमाणे आहे.

प्रकरण पहिले :- नांदेड जिल्हयातील भौगोलिक व ऐतिहासीक परिस्थिती.

प्रकरण दुसरे :- प्राचीन नांदेडचा राजकीय इतिहास

प्रकरण तिसरे :- नांदेड जिल्हयातील प्राचीन किल्ले.

प्रकरण चौथे :- प्राचीन मंदिरे, व शिल्प स्थापत्याचा चिकित्सक अभ्यास.

प्रकरण पाचवे :- निष्कर्ष

प्रकरण : 1 ले :

नांदेड जिल्हयातील भौगोलिक व ऐतिहासिक परिस्थिती

प्रस्तावना :-

1 मे 1960 मध्ये महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. या नवनिर्मित महाराष्ट्र राज्यात मराठवाडा विभागाचा समावेश झाला. छत्तीस जिल्हयाच्या या राज्याचे मुंबई, पुणे , औरंगाबाद, व नागपूर असे चार शासकीय विभाग होते. मराठवाडयाचे क्षेत्रफळ 64813 चौ.कि.मी. इतके होते ते महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रफळाच्या 21.06 प्रतिशत इतके आहे. मराठवाडा विभागातील आठ जिल्हया पैकी नांदेड जिल्हयाची निर्मिती सन 1960 साली झाली. तर नांदेड जिल्हयाचे क्षेत्रफळ 10528 चौ. कि.मी. इतके असून ते मराठवाडा विभागाच्या 16.24 प्रतिशत इतके आहे.

प्रस्तुत प्रकरणात नांदेड जिल्हयाचा इतिहास जिल्हयातीचे स्थान, जिल्हयाचे क्षेत्रफळ सिमा, व विस्तार , पर्जन्यमान , हवामान, जंगले, लोकसंख्या इ. भौगोलिक व ऐतिहासीक परिस्थितीचे विश्लेषण केले आहेत.

A भौगोलिक स्थान व सिमा :

नांदेड जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या दक्षिण-पूर्व सिमेला दक्षिणोत्तर पसरलेला असुन नांदेड जिल्हयाचे स्थान 18.15 ते 19.55 उत्तर अक्षांस व 77.7 ते 78.15 पूर्व रेखांशामध्ये स्थिर आहे. हा जिल्हा महाराष्ट्र कर्नाटक व तेलंगणा राज्याच्या, सरहद्दीवर आहे. नांदेड जिल्हयाची पूर्व पश्चिम लांबी 116 कि.मी. तर उत्तर दक्षिण रुंदी 124 कि.मी. इतकी आहे. नांदेड जिल्हयाचा उत्तरेस हिंगोली व यवतमाळ जिल्हा आणि उत्तर पश्चिमेस परभणी जिल्हा , पश्चिमेस व नैऋतेस लातूर जिल्हा आहे. इ.

- क्षेत्रफळ : 10, 422 चौरस किमी इ.क्षेत्रफळ नांदेडचे
- लोकसंख्या : 2011 नुसार लोकसंख्या नांदेडची 33,56,566 आहे.
- लोकसंख्या घनता : लोकसंख्याच्या घनतांचा बाबतीत नांदेडचे घनता 322 प्रति चौरस किमी आहे.

❖ तालुके : नांदेड जिल्हयात 16 तालुके आहे सर्वात जास्त तालुके आहे. अर्धापूर, भोकर, बिलोली, देगलूर, धर्माबाद, हदगाव, हिमायतनगर, कंधार, किनवट, लोहा, माहूर, मुदखेड, मुखेड नांदेड, नायगाव, उमरी.

❖ साक्षरता दर : 76.94

❖ लिंग गुणोत्तर : 1.06

H) जिल्हयातील पर्यटनस्थळे : श्री गुरुगोविंदसिंह यांचा गुरुद्वारा, माहुरची रेणुकादेवी, (शक्तीपीठ) बिलोली मस्जीद, कंधारचा किल्ला, लोहा तालुक्यातील माळेगाव यात्रा, सहस्त्रकुंड धबधबा, किनवट तालुका देगलूर तालुक्यातील सिध्देश्वर मंदिर , होट्टल , नांदेडचा किल्ला व मुखेड येथील शिवमंदिर

B प्राकृतिक रचना :

नांदेड जिल्हयात मुदखेडच्या टेकडया आहेत. सातमाळा, शिवलिंगप्पा इ. शिखरे आहेत. उत्तरेकडील डोंगराळ प्रदेशामध्ये सातमाळा व निर्मलचे डोंगर आहेत. किनवट, हादगांव, भोकर, आणि हिमायतनगर या तालुक्याचा बराचसा भाग हयात समाविष्ट होतो.

C नद्या व खोरे :

नाशिक येथे उगम पावलेली महाराष्ट्रातील तसेच नांदेड जिल्हयातील सर्वाम मोठी व महत्त्वाची नदी असून पहिल्या क्रमांकाचे खोरे म्हणून गोदावरी नदीचा उल्लेख केला जातो. या नदीच्या काठावर नांदेड व पैठण ही दोन ऐतिहासीक शहरे वसलेली आहेत. मन्याड गोदावरी पैनगंगा , सिना , आसना, लेंडी , मांजरा व सरस्वती , सीमा व आसना या गोदावरीच्या उपनद्या आहेत. पैनगंगेची उपनदी क्याधू ही नदी आहे. गोदावरी ही नदी नांदेड जिल्हयाच्या मध्यभागातून पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहत आंध्र प्रदेशात प्रवेश करते. पैनगंगा नदीवर इस्लापूर जवळ सहस्त्रकुंड नावाचा मोठा धबधबा आहे.

D) नैसर्गिक संपत्ती :

मराठवाडयात नैसर्गिक संपत्ती भरपूर आहे. अनेक ठिकाणी वने, आणि डोंगराळ भाग आहे. त्यात नांदेड जवळ पैनगंगा अभयारण्य आहे. किनवटच्या परिसरात नैसर्गिक जंगल आहे.

नांदेड जिल्हयात किनवट, माहूर , सिंदखेड, व साखणी या भागात जंगले आहे. तर कंधार येथील शांतीघाट, बहादरपूरा वनउद्याणास पंडीत नेहरु वनोद्यान असे म्हणतात.

E) हवामान :

नांदेड जिल्हयाचे हवामान उष्ण कोरडे, म्हणजेच समशीतोष्ण स्वरुपाचे आहे. महाराष्ट्र राज्याप्रमाणेच नांदेड जिल्हयाचे पर्जन्यमान हवामान मौसमी स्वरुपाचे आहे. नांदेड जिल्हयातील किनवट, भोकर व हदगाव तालुक्यात पाऊस जास्त पडतो तर जिल्हयातील कंधार तालुक्यात कमी पाऊस पडतो.

F) जमीन :

नांदेड जिल्हयातील जमीन सर्वसाधारण काळी , सुपीक व कसदार अशा स्वरुपाची आहे. जिल्हयातील सर्व तालुक्यामध्ये काळी जमीन आहे.

G) जलसिंचन :

नांदेड जिल्हयातील शेती ही निसर्गाच्या पावसावर अवलंबून आहे. विहीर, तलाव, कालवे, कूपनलीका, विद्युत पंप, तुषार सिंचन, ठिबक सिंचन , शेतीसाठी पाणी पुरवठा केला जातो. तसेच एक प्रकल्प आहे. विष्णुपूरी प्रकल्प हा असरजन या गावाजवळ आहे. त्यांची स्थापना मे. 1979 मध्ये झाली नांदेड शहराला पिण्यासाठी आणि कारखान्यासाठी पाणी पुरवठा केला जातो.

H) खनिज संपत्ती :

नांदेड जिल्हयातील भूगर्भात महत्त्वाचे उल्लेखनिय असे खनिज पदार्थ आढळत नाहीत. किनवट, तहेसीलच्या काही भागात हलक्या प्रतिच्या चुनखडी चे साठे आढळतात.

❖ ऐतिहासिक परिस्थीती :-

प्राचीन काळापासून मराठवाडयाला महत्त्वाचे स्थान आहे. मानवी संस्कृतीच्या प्रारंभापासून दक्षिणेच्या ऐतिहासीक घडामोडी केंद्रस्थान इथे राहत गेले. संपूर्ण प्राचीन आणि मध्ययुगीन काळात मराठवाडयाचे हे स्थान महत्त्वपूर्ण राहिले.

मराठवाडयातील औरंगाबादला जसे ऐतिहासीक महत्व आहे त्याच प्रमाणेच नांदेड हा मराठवाडयातील दुसऱ्या क्रमांकाच्या जिल्हा आहे. हा जिल्हा ही ऐतिहासिकदृष्टया महत्वाचा आहे. या जिल्हयातील काही ऐतिहासीक स्थळांचा अभ्यास काही विद्वावांनी केलेला आहे. या जिल्हयात आढळणारे प्राचीन अवशेष हे मंदिरे, मुर्तीशिल्पाच्या स्वरुपात आहेत.

गोदावरीच्या काठी वसलेल्या या शहराला जिल्हयाला समृध्द असा इतिहास आहे.

❖ नांदेडची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

महाराष्ट्र राज्याच्या निर्मिती बरोबरच नांदेड जिल्हयाची निर्मिती झाली. नांदेड जिल्हा हा महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये फार प्राचीन परंपरा लाभलेला जिल्हा आहे. नंदराज्याचे वैभव तसेच या राज्यातील घडामोडीची साक्ष हा जिल्हा देतो. नांदेड जिल्हयाचे पूर्वीचे नाव नंदिग्राम व नवदंडी असे होते.

पुरातन काळात पांडव नांदेडला येऊन गेल्याचे सांगितले जाते. येथून पूढे पांडव पांचाळपुरला गेले. ते पांचाळपूर म्हणजे आजचे कंधार होय अशी आख्यायिका सांगितली जाते. आंध्र भृत, सातवाहन, चाणाक्य, राष्ट्रकूट, काकतीय व यादव घराण्याचा सत्ता येथे होऊन गेल्या. मुस्लिम राज्यकर्त्यांच्या पहिल्या हल्याचा बळी पडून नांदेड मलिक काकूरच्या ताब्यात गेले. बहामनी सत्तेत नांदेड तेलगंणात समाविष्ट करण्यात आले. बहामनी राज्याच्या अस्तानंतर नांदेड मोगलांच्या ताब्यात गेले. औरंगजेब दक्षिणकडे सुभेदार म्हणून आला. तेव्हा नांदेड तेलंगणाची राजधानी होती. मध्ययुगीन काळात शिख धर्माचे गुरु गोविंदसिंह यांच्या आगमनाने नांदेड पावन झाले आहे. 1925 मध्ये नांदेड निजामाच्या ताब्यात गेले, 1947 नंतर पोलिस कार्यवाही होऊन हैद्राबाद संस्थान भारतात सामील झाले व राज्यपुर्नरचनेनंतर हा मराठवाडा विभाग द्विभाषिक राज्यात सामील झाला व नांदेड शहर महाराष्ट्र राज्यातील जिल्हयाचे ठिकाण बनले. इ. नांदेड जिल्हयाची ऐतिहासीक महत्व आहे. प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत ऐतिहासीक महत्त्व लाभलेला जिल्हा आहे.

नांदेडची भौगोलिक स्थिती कशी होती त्याचे महाराष्ट्रातील मराठवाडयात भौगोलिक स्थान, सीमा, क्षेत्रफळ, लोकसंख्या, प्रशासकीय विस्तार, जंगले, नैसर्गीक साधनसंपत्ती, इ. माहितीचा अभ्यास या प्रकरणात केला. या प्रकरणात नांदेड ऐतिहासीक पार्श्वभूमी काय होती. प्राचीन काळापासून नांदेड हा शहराला लाभलेला इतिहास इ. चा सखोल अभ्यास या प्रस्तुत प्रकरणात संशोधक करेल.

प्रकरण : 2 रे

प्राचीन नांदेडचा राजकीय इतिहास

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्यात दक्षिण टोकाला तेलंगणा राज्याच्या सीमेलगत नांदेड जिल्हा वसलेला आहे. **नांदेड** या नावाचा उगम **नंदीतट** या शब्दामधून झालेला असून नंदी म्हणजे भगवान श्री शंकराचे वाहन आहे. आणि तट म्हणजे पवित्र गोदावरी नदीचा काठ, नंदीने गोदावरी नदीच्या I किनाऱ्यावर तपस्या केली असल्याची आख्यायिका आहे. आज नांदेड जिल्हा हुजूर साहेब नांदेड या नावाने प्रख्यात झाला आहे. शीख धर्माने गुरु श्री गुरु गोविंदसिंघजी महाराज यांनी सन 1705 मध्ये ठिकाणी आपला देह ठेवला.

नांदेड हे सन 1725 मध्ये हैद्राबाद संस्थानचा हिस्सा झाला आणि 1947 नंतर भारताच्या स्वातंत्र्यानंतर ही निजाम संस्थानने आपले स्वतंत्र अस्तित्व राखल्याने नांदेड हैद्राबाद संस्थानच्या हिस्सा बनून राहिले, हैद्राबाद संस्थान विरुध्द केलेल्या भारत सरकारच्या पोलीस कारवाईनंतर 17 सप्टेंबर 1948 रोजी हैद्राबाद संस्थान स्वतंत्र भारत देशात समाविष्ट झाले. तर राजकीय दृष्टया नांदेड प्राचीन काळापासून ऐतिहासीक महत्त्व लाभलेला आहे. प्राचीन नांदेडचा राजकीय इतिहास प्रस्तुत प्रकरणात पाहणार आहोत.

❖ नांदेड हे नाव कसे पडले :

इ.स. पूर्व सहाव्या शतकाच्या सुमारास महाराष्ट्रातील विविध प्रदेश अश्मक, कुंतल, मलक, अपरांता, ऋषीक, नावाने संबोधिले जाऊ लागले. नांदेड भोवतीच्या प्रदेशाचा समावेश त्या काळी विदर्भात होत असे. या भागाची दक्षिण सीमा गोदावरी नदीपर्यंत होती. नांदेड हे नावच मुळी गोदावरीशी निगडीत आहे. नदीच्या काठावर वसलेले म्हणून नंदीकट , नंदिकड आणि नांदीकट या संस्कृत शब्दापासून नांदेडची उत्पत्ती होते. गोदावरीच्या दोन्ही तीरावर वसलेले म्हणून नंदीकट नांदेडच्या उत्तरेकडील नंदवंशाच्या कारकिर्दीशी संबंध असावा, **नवनंदडेरा** यापासून नांदेड झाले असाव, तसेच **नंदीतह महात्मा** या ग्रंथात येथील तीर्थ स्थानाची माहिती आहे. नंद घराणे हे येथे दीर्घ काळ राज्य करत होते. नंदतट यांचे अपभ्रंश रुप नांदेड आहे. रामायणात ही नांदेडची आख्यायिका सांगितली जाते. भरतचे आसोल म्हणजे नंदीग्राम रावणाचा वध करुन राम पुष्पक विमानाने आयोध्येस परत जाताना नंदीग्राम लागते ते नंदीग्राम म्हणजे आताचे नांदेड आहे.

❖ नांदेडचा राजकीय इतिहास :

प्राचीन काळापासून नांदेड महत्त्वाचे स्थान आहे. इथे नंद काळापासून राजकीय महत्व लाभले. नंद आंध्रभृत, सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकुट, काकतीय व यादव घराण्यांच्या सत्ता येथे होऊन गेल्या.

राजकीयदृष्या सुमारे 400 पेक्षा अधिक वर्षापर्यंत नांदेडच्या परिसर सातवाहनांच्या साम्राज्यात होता. सातवानानंतर इ.स. 250 चे सुमारास वाकाटकांनी राज्य केले. या घराण्यातील विंध्यशक्ती याने विदर्भात राज्य स्थापिले, द्वितीय रुदसेन या वाकाटक राजाची अग्रमहिर्षी प्रभावती गुप्त ही द्वितीय चंद्रगुप्ताची कन्या होती. प्रथम प्रवसेत हा या घराण्यचा संघश्रेष्ठ राजा, तो पराक्रमी होता साहित्यीक आणि प्रजाहितदक्ष होता. याने 60 वर्षे राज्य केले. दख्खनच्या फार मोठया भागावर यांचे अधिपत्य होते. वाकाटकानंतर दक्षिण भारताच्या कांही भागावर राज्य करणारे घराणे **बदामीचे चालुक्य** म्हणून संबोधिले जाते. यांची राजधानी कर्नाटकाच्या विजापूर जिल्हयातील वातापी (बदामी) येथे होती. म्हणून याला **बदामीचे चालुक्य घराणे** असे म्हणतात या घराण्याच्या लेखात नांदेडचा **नंधाल** असा उल्लेख आढळतो.

नांदेडचे परिसराचे भाग्य राष्ट्रकुटाचे काळात उजळले होते तेवढे व तसे बदामीच्या चालुक्यानंतर लत्त्लूरपुरवराधिवर असे स्वतःला म्हणून घेणाऱ्या राज्य होते.

राष्ट्रकुटानंतर या भागावर राज्य केले ते कल्याणीच्या चालुक्य वंशीय राजांनी महाराष्ट्राच्या अन्य कुठल्याही प्रदेशापेक्षा नांदेड आणि उस्मानाबाद या जिल्हयाशी या घराण्याचा निकटचा संबंध होता या काळात या परिसरात किती तरी मंदिरे उभारली गेली पैकी होट्टल मुखेड खानापूर, बाऱ्हाळी, सुगाव, एकलारे, येशगी, सगरोळी, संगम करडखेड, तडखेल इत्यादी ठिकाणच्या मंदिराची माहिती मिळते.

कंधारपासून राजधानी स्थापनणारे राष्ट्रकुल पुढे कल्याणी चालूक्यांचे मंडलिक म्हणून अकराव्या शतकात राहत होते. कल्याणीच्या चालुक्यांचे राज्य चालू असता या घराण्याच्या राज्यकाळामध्ये त्यात मध्येच खंड पडला. प्रस्तुत घराण्याला मराठवाडयाचे कलचुरी असे म्हणता येईल.

महाराष्ट्रभर केवळ नव्हे तर त्या बाहेरच्या विस्तृत प्रदेशावर राज्य करणारे हे यादवांचे घराणे महाराष्ट्र महोदयाच्या इतिहासाच्या उषःकाली सतवाहनांचे साम्राज्य जेवढया महत्वाचे होते तेवढेच प्राचीन काळच्या शेवटी या यादव घराण्याचे महत्व होते. सहाजिकच संपूर्ण नांदेड परिसर त्यांच्या अधिपत्याखाली होता. पांचव्या भिल्ल्याने देवगिरी हे नगर वसलेले आणि तेथे आपली राजधानी हलविली. तेव्हा पासून मराठवाडा महत्वाचा ठरला. कृष्णेच्या उत्तरेकडील सारे राज्य याच्या ताब्यात होते. रुट्ट घराण्याच्या बल्लाळाची अमर्दकपूर (औढा जि हिंगोली) येथे राजधानी होती आणि उपराजधानी होती अराध्यपूर (अर्धापूर जि नांदेड) येथे या ठिकाणी बल्लाळाचा सेनापती चालुक्य याचा निवास असे.

सन 1318 मध्ये यादवांचे राज्य कायमचे बुडले. महाराष्ट्र मुसलमानी सत्तेचा अमल सुरु झाला नांदेड परिसर त्याला अपवाद नव्हता इसवी सन 1296 पर्यंत नांदेड परिसरावर देवगिरीच्या यादवांचा प्रभाव होता. 14 व्या शतकाच्या प्रारंभी घडलेल्या या राजकीय स्थित्यंतराचे दुरगामी परिणाम घडून आले. यादवाचे राज्य नष्ट झाले मुस्लीम सत्ता सुरु झाली.

अशा प्रकारे इ.स. पूर्व पाचव्या शतकातील अश्मक आणि मुलक ही दोन्ही महानपदे या परिसरातील त्यानंतर अनुक्रमे सातवाहन, वाकाटक, पूर्व चालुक्य, राष्ट्रकुल, उत्तर चालुक्य, यादव , शिलाघर, कलचुरी या राज्यसत्तांच्या कालखंडात या परिसराने आर्थिक संपन्नता, राजकीय स्थैर्य , प्राचीन व्यापार, उदीम, उपभोगली मोठ मोठी व्यापारी शहरे इथे उदयाला आली. अप्रतिम कालविष्कार घडविले. दऱ्याखोऱ्यातून सहयाद्रीच्या कडया कपारीतुन अप्रतिम कला अविष्कार घडविले, होते या कला आविष्काराला उदार हसते मदत करणारे संपन्न व्यापारी इथे होते. राज्य घराण्याच्या कोषागारात अमित संपत्ती होती. 13 व्या शतकात हे सारे बदलू लागले, परकोटीचा सत्ता संघर्ष सुरु झाला. त्याची झळ नांदेड जिल्हयाला ही बसली.

प्राचीन नांदेडचा राजकीय इतिहासाची संक्षिप्त माहिती प्रस्तुत प्रकरणात करण्यात येईल त्याचा अभ्यास या प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण : 3 रे

नांदेड जिल्हयातील प्राचीन किल्ले

प्रस्तावना :-

नांदेड मराठवाडयातील एक महत्वाचा जिल्हा ऐतिहासीक व धार्मिक पर्यटनस्थळ असलेल्या नांदेडला प्राचीन इतिहास लाभला आहे. याचे प्राचीन नंदनदडेरा होते. तसेच काही प्राचीन किल्ले आहे त्याची माहिती या प्रकरणात घेण्यात येईल.

❖ नंदगिरी किल्ला :

नांदेड जिल्हयातील प्राचीन किल्यामधील नंदगिरी किल्ला एक आहे. गोदावरीच्या काठावर नांदेडला नंदगिरी, नावाचा एक किल्ला आहे. किल्याची नदीच्या पात्राकडील तटबंदी लक्षात येण्याइतपत कायम आहे. या किल्याचा विस्तार खूपच मोठा होता. किल्याभोवती तटबंदीच्या चार भिंतीचे अवशेष आजही आढळतात.

❖ माहूर किल्ला :

नांदेडपासून 130 कि.मी. अंतरावर असलेले महाराष्ट्रातील असंख्य भाविकांचे श्रध्दास्थान म्हणजे श्रीक्षेत्र माहूरगड देवीच्या साडेतीन पीठांपैकी एक आहे. माहूर गावापासून दक्षिणेस उंच अशा दोन टेकडयांवर किल्ल्याचे बांधकाम करण्यत आले आहे. दोन तटबंदी असलेला भव्य किल्ला आहे हा किल्ला उंच डोंगरावर असल्यामुळे त्यास **डोंगरी किल्ला** म्हणतात. या किल्ल्याला माहूरगड आणि रामगड अशी नावे आहेत. 12 व्या शतकात देवगिरीचे राजा रामदेव यांनी माहूरचा किल्ला जिंकून घेतला. किल्ल्यात प्रवेश करण्यासाठी दक्षिणेकडील दक्षिण दरवाजा उत्तरेकडील मुख्य दरवाजा व रेणुकादेवीकडील महाकाली बुरुज येथून जाण्यासाठी रस्ते आहेत. किल्ल्यात हत्ती दरवाजा, बारुदखाना , महाकाली बुरुज, धनबुरुज , यासह अनेक बुरुज आजही जसेच्या तसे आहेत. माहूर किल्ला हा गिरीदुर्ग आहे. किल्ल्याच्या स्थापत्याशैलीवरुन या किल्ल्याचा विकास बहामनी व मोगलांच्या काळात झाला असावा.

❖ कंधारचा किल्ला :

नांदेडचे ऐतिहासीक पर्यटन म्हणजे हजार बाराशे वर्षापूर्वीच्या शिल्प स्थापत्य अवशेषांचे दुर्मिळ दर्शन. राष्ट्रकुट कलाशैलीचे असंख्यच अवशेष राष्ट्रकुटाच्या उपराजधानीत म्हणले जे कंधार येथे पहायला मिळतात. महाराष्ट्रातील भुईकोट किल्यामध्ये कंधारचा किल्ला सर्वात मोठा आहे. किल्ल्याचा विस्तार सुमारे 24 एकराचा आहे. अगदी जवळ जाईपर्यंत किल्ला दिसत नाही हे किल्याचे वैशिष्टय आहे. इ. सनाच्या चौथ्या शतकात नांदेडच्या परिसरात वरंगलचा काकती घराण्याचा प्रभाव होता. काकतीय नृपती राजा तिसरा सोमेश्वर देव यांने हा किल्ला बांधल्याची नोंद **प्रतापरुद्र यशोभूषण** हा ग्रंथात आढळते.

राष्ट्रकुटांनी या ठिकाणी **जंगतुंग समूद्र** या तलावाची निर्मिती केली किल्याभोवती शंभर फुट रुंदीचा आणि पाच फुट खोलीचा मोठा खंदक आहे. खंदकाला लागून असलेल्या भिंतीची उंची 120 फुट आहे. किल्ल्याला 150 ते 200 फुट उंचीचे 16 बुरुज आहेत.

या प्रस्तुत प्रकरणात किल्ला कोणकोणत्या प्रकाराचे होते डोंगर किल्ला, भुईकोट किल्ला इ. किल्ल्याचे बांधकाम कसे होते त्यांची निर्मिती कोणाच्या काळात झाली. कोणत्या शैलीत बांधला आहे इ. अभ्यास या प्रकरणात करणार आहे.

प्रकरण 4 थे

प्राचीन मंदिरे व शिला स्थापत्याचा चिकित्सक अभ्यास

प्रस्तावना :-

नांदेड जिल्हयाला ऐतिहासीक महत्व आहे. प्राचीन मंदिरे व शिल्प स्थापत्य अभ्यास या प्रकरणात केला जाणार आहे. कोणकोणत्या मंदिरे कोणी बांधली कोणाच्या काळात बांधली गेली त्याचे बांधकामाची शैली कोणती होती, तसेच शिल्प स्थापत्य कोणते सापडले, त्याचे राजकीय महत्व त्यातून शिल्पशैलीचा त्याचा राजा, राजकीय कलात्मक, धार्मीकदृष्टया , समाजदृष्टया काय महत्व होते त्याचे संक्षिप्त व चिकित्सक अभ्यास या प्रकरणात केला जाईल. नांदेड मध्ये काही प्राचीन मंदिरे आहे व काही शिल्प स्थापत्य सापडली आहे.

❖ माहूरचे मंदिरे व स्थापत्य :

माहूरचे प्राचीन नाव मातापूर होते. त्यांच्याच अपभ्रंश माहूर असा झाला आहे. मराठवाडयातील नांदेड जिल्हयातील माहूर येथील शक्ती मंदिर प्रसिध्द आहे. येथील महत्वाचे स्थान म्हणजे माता रेणुका देवीचे मंदिर होय. मंदिर डोंगरावर उंच जागी बांधलेले आहे. रेणुकादेवी जगदंबा , हिच्या स्वरुपाची ती एकजीव झालेली आहे हिचे मंदिर गावालगतच्या गिरी शिखरांवर आहे. वर चढण्यासाठी हजार दीडहजार पायऱ्या बांधलेल्या आहेत. मंदिराचे वास्तुशिल्प प्राचीन पध्दतीचे आहे. रेणुकेच्या शेजारीच महालक्ष्मी व तुळजा भवानी यांची दोन लहान मंदिरे आहेत. रेणुकेच्या पूर्वेस 3 मैल अंतरावर दत्तात्रयचे मंदिर आहेत. त्याला **दत्तशिखर** म्हणतात. इ.स. 1219 मध्ये **मुकुंदभारती** या महंताने हे दत्तमंदिर बांधले. या दत्तस्थानाला औरंगजेबाकडून 40 हजाराची जहागिरी मिळाली हे विशेष होय.

तसेच सत्य अनुसयाचे मंदिर आहे. स्थापत्यशास्त्र व मूर्तिशिल्प शास्त्राच्या दृष्टीने रेणुकेचे मंदिर व दत्त मंदिर अप्रतिम आहे.

❖ कंधार मंदिरे व स्थापत्य :

प्राचीन काळी कंधारला मंदिरांचे नगर म्हणून ही ओळखले जात होते. मंडळीसिध्दी विनायक , कामदवे, कालप्रियनाथ, संगवेश्वर, बंकेश्वर, श्रीकृष्णेश्वर , श्री क्षेत्रपाल, वीर नारायण, छलेश्वर , गोजिंग सोमनाथ्, तुंबेश्वर , तुंडीगेश्वर, इ. मंदिराचे पुरावेशेष कंधार परिसरात पाहायला मिळतात. बौध्द जैन

कालीन मूर्ती, शिलालेख, विहार असल्याचे अनेक पुरावे, मिळालेले आहेत. तसेच पार्श्वनाथ , वृषभनाथ , वर्धमान, महावीर, गौतमबुध्द, इ. संबंधी ताम्रपट, शिल्प , शिलालेख ऐतिहासीक पुरावे उपलब्ध झाले आहेत.

जागृत देवस्थान, केदारगुडा हे हदगाव तालुक्यातील आहे. श्री जटाशंकर देवस्थान डोंगरकडा हे नांदेड व हिंगोली या राज्यरस्त्यावर हे प्राचीन मंदिर आहे. दशरथेश्वर मंदिर मुखेड येथे आहे. मंदिरातील दगडावर कलात्मक कला कसुर कोरलेली आहे. मंदिरावर पस्तीसपेक्षा जास्त मोठी कोरीव द्विमीतीतील शिल्पे आहेत.

अर्धापूर येथील मंदिरे हे चालूक्य व यादव काळात आहे इथे 16 मंदिरे आहे इंद्रेश्वर मंदिर, केदारेश्वर मंदिर, भीमेश्वर मंदिर , नागेश्वर मंदिर, विश्वेश्वर मंदिर, संकलेश्वर मंदिर, सोमनाथ मंदिर, राजेश्वर मंदिर , नरसिंह मंदिर, विनायक मंदिर, शंभुनारायण मंदिर, भारतेश्वर मंदिर, कलमेश्वर मंदिर, सिध्दांतनाथदेव मंदिर, कालीकादेवी मंदिर इ. प्राचीन मंदिरे आहे.

तसेच होट्टल येथील सिध्देश्वर मंदिर हे मंदिर सिंधूदुर्ग याने बांधले आहे आणि रेषेश्वर मंदिर चालुक्य काळातील आहे.

काळेश्वर मंदिर नांदेड जिल्हयातील एक प्राचीन मंदिर आहे त्यात गणेश मंदिर आहे. हे मंदिर हेमाडपंथी असुन त्यामध्ये फक्त गणेश मूर्ती आहे. इ. प्राचीन मंदिरे आहे. काही हेमाडपंथी शैलीचे द्रविडशैलीच्या प्रकारात मोडते.

❖ शिलालेख :

अर्धापूर येथे करडखेड, तडखेल, काही स्थापत्य व शिलालेख सापडले आहे. हे प्राचीन असुन चालुक्य कालीन आहे.

बिलोली तालुक्यात सगरोळी येथे कल्याणी चालुक्याच्या चार शिलालेख मिळाले. तसेच बिलोली तालुक्यात असलेले जुन्नी शिलालेख मिळाले आहे. हे एक यादव व चालुक्य काळात धार्मिक क्षेत्र होते. देगलूर तालुक्यात येरगी चालुक्य काळातील कानडी शिलालेख मिळाले. केशवराज व नागरेश्वर ही मंदिरे आहेत.

❖ जलस्थापत्य :

जलस्थापत्य दृष्टीने नांदेड जिल्हयातील मुखेड दशरथेश्वर मंदिराजवळच रामायण काळातील मोठया आकाराची एक बारव आहे. काम कठीण दगड व चुन्याचा वापर करुन तिचे बांधकाम केलेले आहे. बारावची खोली 20 फुट तर लांबी व रुंदी 30 फुट आहे. येथील पाण्याचा वापर देवतांना स्नान घालण्यासाठी केला जात असल्यामुळे तेथील पाणी पवित्र समजले जाते.

तसेच कंधार हे प्राचीन असून अनेक मंदिरे आहेतच तेथील संगमेश्वर मंदिर हे जगतुंग या प्राचीन तलावाच्या काठावर होते. कंधारचा जगतुंग तलाव हे जलस्थापत्याचे उत्कृष्ट नमुना आहे राष्टकुट कालीन आहे.

❖ मूर्तीस्थापत्य :

कंधार हे नगर प्राचीन काळात जैन धर्माचे केंद्र होते. इ. सनाच्या आठव्या शतकातील बऱ्याच जैन प्रमि येथील उत्खननात मिळालेल्या आहेत. वर्धमान महावीरांची एक भव्य मूर्ती हत्तीपुरा भिमनगर, येथ् बौध्द मंदिराच्या पुढे ठेवलेली आहे. तसेच पार्श्वभूमीनाथची मूर्ती मिळाली. प्राचीन काळात विविध मूर्ती उत्खननात सापडलेला आहे.

नांदेड जिल्हयात प्राचीन मंदिरे शिल्प स्थापत्य , नाणी, शिलालेख, ताम्रपट, जलस्थापत्य, पुरातत्व अवशेष सापडलेले आहेत. वरील बाबींचा अभ्यास या प्रस्तुत प्रकरणात चिकित्सक दृष्टीने अभ्यास करावयाचा आहे.

प्रकरण 5 वे

निष्कर्ष

प्रस्तावना :-

प्रस्तुत शोध प्रबंधाच्या शेवटच्या पाचव्या प्रकरणाचे शिर्षक हे निष्कर्ष असे असेल. यात वरील चार प्रकरणांचा आढावा घेवून विविध साधनांच्या संदर्भ ग्रंथाच्या आधारे तसेच उपलब्ध माहितीद्वारे प्रस्तुत प्रकरणात चिकित्सक दृष्टीने निष्कर्ष काढला जाईल.

संदर्भ सुचि :

1. टेम्पल्स इन मराठवाडा - **डॉ. देव**
2. नांदेड हेरीटेस - **डॉ. देव**
3. मराठवाडयातील किल्ले - **डॉ. सावंत**
4. महाराष्ट्र धर्म आणि परंपरा - **डॉ. देव**
5. यादव कालीन महाराष्ट्र, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर मुंबई 1963 - **मु.ग.पानसे**
6. मराठवाडयातील मराठी शिलालेख, कुलसचिव, मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद 1989 **डॉ. यु.म.पठाण**
7. महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास आणि संस्कृती , पूणे विद्यापीठ, प्रकाशन पुणे, 1964 **प्रा. द.बा. डिसकळकर**
8. महाराष्ट्रातील पुरातत्व, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, 1976 **सांकलिया माटे**
9. मराठवाडयाचा इतिहास - **डॉ. कठारे / डॉ. नगराळे**
10. कंधारचा इतिहास - **डॉ. कठारे**
11. देवगिरीचे यादव समर्थ प्रकाशन, टिळक पथ ओरंगाबाद. - **ब्रम्हानंद देशपांडे**
12. प्राचीन भारत , कल्पना प्रकाशन, शिवाजीनगर नांदेड 1997 - **प्रा. अनिल कठारे**
13. महाराष्ट्राचे गॅझेट
14. नांदेडचे गॅझेट
15. **M. Deshmukh** - I copnography of the Hindu Temple in Marathwada, Publication Scheme, 57, Mishar Rajaji Ka Rasta Jaipur 01, 1987.
16. **M.S. Naravane -** Forts of Maharashtra Aph Publishing Corporation, 5 Ansari road, Druya Ganj Near Delhi- 95
17. **Mrs. Dulari Kuresh -** Stone Sculptre the history Masijum , Marathwada University, Aurangabad.

नोट :- नांदेड जिल्हयातील कला स्थापत्यावर माहिती उपलब्ध झाल्यास ती त्या प्रकरणात घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

आवश्यकता असलेल्या प्रकरणात बदल करण्यात येईल.

मार्गदर्शक
डॉ. शिंदे संगिता
पदव्युत्तर इतिहास विभाग
यशवंत महाविद्यालय, नांदेड

संशोधक विद्यार्थीनी
आरती लालचंद भगत